# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी ४११ ०१८

---

## निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील 'स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक' या संवर्गातील पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकरीता जाहिरात क्र.४७३/२०१५ प्रसिध्द करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या जाहिरातीनुसार दुसऱ्या टप्प्यामध्ये दि.०९/०७/२०१५ रोजी संभाव्य निवड क्षेत्रात येणाऱ्या उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आलेली होती. तथापि प्रस्तुतच्या जाहिरातीनुसार प्रथम टप्प्यावरील निवड व प्रतिक्षा यादीवर मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका न्यायप्रविष्ठ झालेल्या होत्या. प्रस्तुतच्या याचिकांसंदर्भात मे. न्यायालयाचा अंतिम निर्णय झालेने दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार करणेकामी दि.०१/०९/२०१७ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदे भरण्याकरीता कर्मचारी निवड समितीने दि.२६/०६/२०१५रोजी उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार केलेली असून प्रथम निवड यादी तयार केल्यापासून आजअखेरपर्यंत २ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने उर्वरीत पदांसाठी निवड व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊ नये, या प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

सबब, 'स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक' पदाकरीता दुसऱ्या टप्प्यामध्ये करण्यात आलेल्या कागदपत्र पडताळणीनुसार निवड व प्रतिक्षा यादीची कार्यवाही रद्द करण्यात येत असलेबाबत प्रस्तुतच्या निवेदनाव्दारे जाहीर करण्यात येत आहे.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक प्रशासन/३/कावि/८९४/२०१७
दिनांक १७/१०/२०१७